# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## कला विद्याशाखेच्या मराठी विषयातील पीएच्.डी.

पदवीकरिता सादर करावयाच्या

प्रबंधाचे प्रारूप

**अभ्यास विषय**

## ''वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या स्त्री संवेदना : एक अभ्यास ''
## (संत जनाबाई ते संत बहिणाबाई )

**संशोधक**

**बाळासाहेब निवृत्ती कराड**

एम.ए मराठी, समाजशास्त्र. बी.एड्. सेट

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ. बाळासाहेब रंगनाथराव दहिफळे**

एम.ए.मराठी,बी.एड्.एम.फिल,पीएच्.डी.सेट

संशोधक मार्गदर्शक, मराठी विभाग

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर

मे–2019

## ''वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या स्त्री संवेदना : एक अभ्यास ''

**प्रस्ताविक :**

मध्ययुगीन महाराष्ट्रात भक्तीमार्गाचे जे अनेक पंथ निर्माण झाले, त्यातील एक प्रमुख आणि जनसामान्यांच्या मनावर आजही अधिराज्य गाजवणारा पंथ म्हणजेच वारकरी संप्रदाय. यालाच भागवत धर्म असेही म्हटले जाते. काही ऐतिहासिक घडामोडीमुळे महाराष्ट्रात मध्ययुगीन कालखंडात जी सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अवकळा निर्माण झाली. अशावेळी समाजाला धर्म, संस्कृती आणि सदाचार शिकवून सर्वाना भक्ती आणि वारीच्या तत्त्वाखाली एकत्र आणण्याचे काम या पंथाने केले.

वारकरी पंथ हा मुळातच सर्वसमावेशक पंथ म्हणून ओळखला जातो. म्हणून इथे वय, जात, लिंग, वर्ण, धर्म याला अजिबात थारा दिला गेला नाही. अशावेळी या पंथात जे साहित्य निर्माण झाले ते पुरूषांइतकेच स्त्रीयांसाठीसुध्दा महत्त्वपुर्ण ठरले. तत्कालिन सामाजिक परिस्थिती पाहता आणि वारकरी संप्रदायाच्या सतत संपर्कात आल्याने महाराष्ट्रातील स्त्रीया या काव्यरचना करू लागल्या. त्यातूनच वारकरी संप्रदायात स्त्री संतकवयित्रींचा हळूहळू उदय झाला. महाराष्ट्रात संतकवयित्रींना आध्यात्म क्षेत्रातील प्रेरणा ही संतकवींपासूनच मिळालेली दिसते. संत मुक्ताबाईना संत ज्ञानेश्वर, संत निवृत्तीनाथ, संत जनाबाईना संत नामदेव, संत सोयराबाईना संत चोखामेळा, संत बहिणाबाईना संत तुकाराम अशी अनेक उदाहरणे आपणास देता येतील.

संत कवयित्रींनी आपल्या काव्यातून आध्यात्मासारखा विषय हाताळलेला आहे. परंतु आध्यात्मिक विषयाची सहज मांडणी करण्यासाठी त्यांनी प्रचलित समाजजीवनातील रूपके, दृष्टांत, उदाहरणे, दाखले वापरलेले दिसून येतात, त्यामुळे समाजाचा व काव्याचा किती जवळचा संबंध आहे हे संतकवयित्रींनी स्वउदाहरणाने दाखवून दिले आहे. या संतकवयित्रींनी रचलेले अभंग निश्चितच स्त्री–जीवनातील अनुभवांना स्पर्श करणारे आहेत. त्यांनी समाजातील अनेक चांगल्या–वाईट प्रथा–परंपरा यांचेही उल्लेख त्यांच्या साहित्याद्वारे संत कवयित्रीनी तत्कालीन समाज, संस्कृती व स्त्री–जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविलेले आहे. संत कवींच्या प्रेरणेने संत कवयित्रींनी आध्यात्मिक मार्ग स्वीकारला आणि समाजातील अनेक संतकवयित्रीना आत्मविकासाचा मार्ग खुला झाला. मध्ययुगीन काळातील धार्मिक बंधनात जखडलेल्या सामान्य स्त्रीला आत्मोद्धाराचा मार्ग मिळाला.भक्ती व आध्यात्मिक ज्ञान यांच्या आधाराने संतकवयित्रींनी स्वकर्तृत्व प्राप्त केले. त्यांनी आध्यात्म व साहित्य क्षेत्रात दिलेल्या योगदानामुळे त्यांना समाजिक प्रतिष्ठाही प्राप्त झाली.

परमेश्वरावरील प्रेम,अतूट निष्ठा व मानवतेची दृष्टी इत्यादी शाश्वत मूल्ये या वारकरी संत कवयित्रींच्या काव्यात आढळतात. ही शाश्वत जीवनमूल्ये समाजहितासाठी तर आवश्यक आहेतच पण त्याबरोबरच संत कवयित्रीनीं दर्शविलेला आत्मोन्नतीचा आणि आत्मविकासाच्या मार्गाचा ठसा आजही समाजात सदैव आणि चिरकाल टिकणारा आहे.

**विषय निवडीमागील भूमिका :**

'वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या स्त्री संवेदना : एक अभ्यास' हा विषय घेऊन मी जे काही संशोधन करणार आहे; त्या अनुषंगाने या विषयाच्या निवडीमागील भुमीका मांडत असताना मला संत साहित्याबद्दल आजपर्यंत जितके संशोधन झाले ; त्यात आधुनिक काळाला अनुसरून निश्चितच भर टाकता येईल असे वाटते. मी ग्रामीण भागात जन्मलेला,वाढलेला आणि ग्रामीण भागातच राहत असल्यामुळे ग्रामीण भागाची मला जाणीव आहे.तसेच ग्रामीण भागात आध्यात्म व भक्ती म्हणून कथा, कीर्तन, रामायण, प्रवचन इत्यादी प्रबोधनात्मक बाबी चालतात. त्यातून जेवढा ऊहापोह संत कवींचा होतो तेवढा संतकवयित्रींचा होताना दिसत नाही. त्याचबरोबर विशेषतः कीर्तनासाठी निवडलेला अभंग (निरूपणासाठी) एखाद्या संत कवींचा आसतो, क्वचित प्रसंगी संत कवयित्रींचा निवडला जातो. त्यामुळे अशा अनेक संत कवयित्री आहेत की, ज्याची रचना, साहित्य हे कीर्तन, कथा, प्रवचन याकडून दुर्लक्ष होताना दिसत आहे आणि याची घालमेल माझ्या मनात कुठेतरी नेहमी सलत रहायची. पुढेपुढे मग अनेक संत कवयित्रींच्या रचना वाचण्यात आल्या. परंतु त्या मला कीर्तनात, कथेत, प्रवचनांत व्यक्त होताना दिसत नव्हत्या साहजिकच त्यामुळे मी या विषयाकडे वळलो. वारकरी संप्रदायातील स्त्री संवेदना दर्शवणारा स्वतंत्र संत कवयित्रींचा प्रवाह निर्माण झालेला दिसून येतो. यातून व्यक्त होणाऱ्या स्त्री संवेदना हा माझ्या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे.कोणत्याही कालखंडातील असलेली स्त्री ही तिच्या भावना जपताना व व्यक्त करताना दिसते. आधुनिक काळातील असलेला स्त्रीचा भाव आणि मध्ययुगीन कालखंडातील संत कवयित्रींचा भाव हा स्त्री म्हणून एकाच पातळीवर आहे.फक्त संत कवयित्रींना भक्तीची असलेली ओढ आणि त्यांच्या मनाची होणारी घालमेल,संवेदना,त्यांनी व्यक्त केलेल्या मला भावल्या; म्हणून मी या विषयाकडे वळलो.

**उद्दिष्टे :**

१. वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या अभंगांचे स्वरूप स्पष्ट करणे.

२. वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या अभंगांचे वेगळेपण स्पष्ट करणे.

३. वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या भक्तीचे स्वरूप स्पष्ट करणे.

४. वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या स्त्री संवेदनेचे स्वरूप स्पष्ट करणे.

५. वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या अभंगाधारे आजच्या वास्तवाची तुलना करणे.

६. तत्कालीन समाजजीवनात वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींचे महत्त्व विशद करणे.

**विषयाचे महत्त्व :**

आजपर्यंतच्या काळात संतसाहित्यावर अनेक संशोधकांनी संशोधन केले आहे. परंतु आधुनिक काळात समाजसुधारणेचे जे जे विचार आहेत त्यांचे मूळ संतसाहित्यात असून त्याचा वेगळया अंगाने शोध घेतला तर त्याचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी अधिक होतो.

पूर्वीपासूनच चूल आणि मूल इतकी मर्यादा असलेल्या स्त्रीवर सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक अशी अनेक बंधने होती. कोणताही स्वतंत्र निर्णय घेण्याचा तिला अधिकार नव्हता (काही अपवादात्मक स्त्रीया सोडून) अशा कालखंडात वारकरी पंथात/भागवत धर्मात ज्या संत कवयित्रींना तत्कालीन परिस्थितीला छेद देत जे काही कर्तृत्व केलेले दिसून येते ते नेहमी स्तुत्यच आहे.परंतु तेही काही सहजासहजी घडलेली घटना नव्हती आणि अशा परिस्थितीमध्ये भक्तीमार्गावरून चालताना, ज्ञानाची भूक भागवताना ज्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक अडचणी आल्या त्या संत कवयित्रींनी आपल्या काव्याच्या, साहित्याच्या माध्यमातून मांडल्या. परंतु ज्या काही प्रथा-परंपरा होत्या त्यांनाही छेद देण्याचे काम या संत कवयित्रींनी तत्कालीन परिस्थितीला तोंड देत केलेले दिसून येते.

आजच्या स्त्रीयांना संत कवयित्रींच्या रचना निश्चितच मार्गदर्शक ठरतील, लढण्यांच आणि जगण्याचं बळही देतील. समाजाचे व्यापक हित लक्षात घेता समाजसुधारणेच्या दृष्टीने संतसाहित्य उपयुक्त असल्याने या विषयाचे, निरनिराळया पैलूंचे संशोधन होणे आवश्यक आहे.

**संशोधन पध्दती व संशोधन साधने :**

'वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या स्त्री संवेदना' याचे संशोधनात्मक विवेचन मांडण्यासाठी मी विचारविमर्ष, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, आस्वादात्मक, संकलनात्मक आदी अभ्यास पध्दतींचा अवलंब करून या विषयाची मांडणी करणार आहे. ज्यामुळे आधुनिक काळातल्या समाजहीत, राष्ट्रहीत जोपासणा-या चळवळींना व स्त्री चळवळींना अधिक बळकटी देण्यास मदत होईल.

संशोधन कार्य करताना याबाबतीत ज्या–ज्या मान्यवर ग्रंथकारांनी, समीक्षकांनी ग्रंथरचना केली आहे त्यांचा वापर तसेच पूर्वसुरीचे लेख, तज्ञांच्या मुलाखती इत्यादी साधनांद्वारे संशोधन काम करण्यात येईल.

**विषयाची व्याप्ती :**

सदरील विषयाच्या अनुषंगाने मी या विषयाची पुढील आठ प्रकरणामध्ये विभागणी करून मांडणी करणार आहे. लहानपणापासूनच माझ्या मनावर संतसाहित्याचा प्रभाव असल्यामुळे व एक अभ्यासक म्हणून संतसाहित्याची आवड असल्यामुळे संत साहित्याला आधुनिक काळात तत्कालीन 'स्त्री संवेदना' वेगळया भूमिकेतून विस्ताराने मांडणे महत्त्वपूर्ण आहे. एकूणच सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक जडणघडणीवर संतसाहित्याचा वारकऱ्यांचा प्रभाव आहे. आधुनिक काळात या विविध क्षेत्रातल्या सुधारणेचे मूळ संतसाहित्यात आहे. तसेच याचा आणखी

ऊहापोह झाला तर त्याचे भविष्यातील परिणाम निश्चितच चांगले होणार आहेत; कारण संतानी आपल्या साहित्यात व्यापक समाजहीत जोपासलेले आहे.

विषयाची व्याप्ती लक्षात घेता संतसाहित्यात वारकरी संत कवयित्री व त्यांचे साहित्य यांचाच प्रामुख्याने विचार करण्याच्या दृष्टीने मी प्रयत्नशील राहणार आहे. यात संत जनाबाई ते संत बहिणाबाईपर्यंतच्या संत कवयित्रींचे साहित्य या विषयाच्या विवेचना संदर्भात मांडणार आहे. अशी या विषयाला मर्यादा घालून त्यात संशोधन करणार आहे.

**निष्कर्ष :**

प्राथमिक पातळीवर माझ्या संशोधन विषयाचा विचार करता मी पुढील निष्कर्ष नोंदवीत आहे.

१. संत साहित्याची परंपरा समाजसुधारणेच्या व्यापक तळमळीतून साकार झाली आहे.
२. संत साहित्याने समाजाचे उन्नयन करण्यासाठी नीतिबोधात्मक मूल्यांचा विचार अग्रहीपणे मांडला आहे.
३. आधुनिक काळात आलेले राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आदी विचारांचे मूळ संतसाहित्यात आढळते.
४. संत साहित्यातून समाजजागृती केलेली आहे.
५. संत कवयित्रींच्या एक स़्त्री म्हणून भावना व्यक्त झाल्या आहेत.
६. दबलेपण नाकारून बंडाचे निशाण काही संत कवयित्री उभे करतात.
७. परमेश्वराच्या भक्तीला संसारसोबत जोडून आपला भाव व्यक्त करताना संत कवयित्री दिसतात.

या शिवाय अभ्यासाअंती निघालेले निष्कर्ष मी मांडणार आहे.

**प्रकरणांची मांडणी :**

सदरील प्रकरणांची मांडणी करण्यासाठी पुढे आठ प्रकरणांत विभागणी करून विवेचन करणार आहे.

**प्रकरण पहिले – वारकरी संप्रदायाचा इतिहास व परंपरा :**

सर्वसामान्य मानसाला धर्म, संस्कृती आणि सदाचार खऱ्या अर्थाने ज्या संप्रदायाने शिकवला तो संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय 'वारकरी' हा शब्द वारी करणे, येरझारणे, व्रत, नियमित फेरी, यात्रा अशा अनेक अर्थाने वापरला जातो, ही यात्रा, व्रत, येरझारणे हे अनेक देवदेवतांच्या बाबतीत भक्तांकडून होते. परंतु वारकरी ही संकल्पना विठ्ठल आणि पंढरपूर यांच्याशीच संबंध दाखवते म्हणून पंढरपूरची वारी करणारा तो वारकरी.

वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वर महाराजांनी घातला असे सर्वसामान्यपणे मानले जाते. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या वडिलांनीही वारी केल्याचे आढळून येते म्हणून वारकरी संप्रदाय हा संत ज्ञानेश्वरांपूर्वीही अस्तित्वात होता हे सिध्द होते. परंतु तत्कालीन परिस्थिती पाहता वारकरी

संप्रदाय विस्कळीत असल्याचे उल्लेख केले जातात. परंतु संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला संघटित रूप देऊन त्यानंतरच्या अनेक संतानी त्याला बळकटी दिल्याचे दिसते. वारकरी संप्रदायाचे आराध्यदैवत श्री विठ्ठल पंढरपूरात कसा आला या बाबतीत भक्त पुंडलिकाची कथा सांगीतली जाते, तेव्हापासून ही वारीची परंपरा आली असावी. या वारीत महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, एवढेच नाही तर संपूर्ण भारतांतून आणि जगभरातूंनही विठ्ठलभक्त येतात. वारी ही प्रामुख्याने वर्षातून दोनदा केली जाते. परंतु आषाढी, कार्तिकी, माघी आणि चैत्री अशाही चार वाऱ्या करणारे काही वारकरी आहेत. तर काही वारकरी प्रत्येक महिन्याला वारी करतात.

वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार होण्याचे मुख्य कारण म्हणजे साहित्य आणि कीर्तन हे होय. वारकरी संप्रदायातील संतांनी प्रामुख्याने अभंग, ओवी, भारूड, गौळणी, विराण्या अशा वेगवेगळया रचना हाताळल्या आणि त्या कीर्तनाच्या माध्यमातून सर्वसामान्य मानसांपर्यंत पोहचवल्या. कीर्तनात एक नारदीय आणि दुसरे वारकरी कीर्तन आढळते. नारदीय कीर्तन परंपरा नारदांनी आणि दुसरी वारकरी कीर्तनाची परंपरा संत नामदेवानी सुरू केलेली आढळते. आजही वारकरी संप्रदायात कीर्तन मोठया प्रमाणात आढळते.

**प्रकरण दुसरे – वारकरी संप्रदायातील संत साहित्य स्वरूप व परंपरा :**

'वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ' असे म्हणत मोक्षाची वाट भक्तीच्या रूपाने सुकर करण्यासाठी प्रपंचात राहून परमार्थ कसा साधता येतो? भक्तीचे अवडंबर न माजवता सदा सर्वदा कशी भक्ती करता येते? हे पटवून देत रंजल्या गांजल्या सर्वसामान्य मानसांना विठ्ठलभक्तीच्या छत्राखाली एकत्रित करून ' यारे यारे लहान थोर याती भलत्या नारी नर ' म्हणत संतानी आनंदाचा काला केला. या साठी काही संतानी कीर्तन. काही संतानी साहित्य तर काही दोन्हींचाही आधार घेतला. संतानी साहित्यिक रचना करताना प्रामुख्याने अभंग, ओवी, भारूड, गवळण अशा विविध काव्यरचना सहजतेने हाताळल्या. वारकरी संप्रदायात असे अनेक संत होऊन गेले की, त्याच्या रचना आजही काही वारकऱ्यांना मुखोद्गत आहेत.

प्रस्तुत प्रकरणात वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर ते संत निळोबाराय या संत कवींचा तसेच संत जनाबाई ते संत बहिणाबाई या संत कवयित्रींचा आणि त्यांच्या साहित्याचा प्रामुख्याने विचार करून मांडणी केली जाणार आहे.

**प्रकरण तिसरे – वारकरी संप्रदायातील संत कवयित्री :**

मध्ययुगीन महाराष्ट्रात मोक्षाच्या नावाखाली भक्तीचे अवडंबर धर्माच्या पाईकांनी माजवले. मोक्षाच्या नावाखाली भक्तांची लुटालूट होऊ लागली. अशावेळी भक्तीचा सहज आणि सोपा मार्ग सांगण्यासाठी संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला आणि 'यारे यारे लहान थोर याती भलत्या नारी नर ' म्हणत रंजल्यागांजल्या सर्वसामान्य मानसांसाठी परिस्थितीचे खंबीर काटे वेचत 'वारी' चा एक नवा महामार्ग सुरू केला. या मार्गावरून चालताना सर्व समाजातील, धर्मातील, आठरापगड जातीतील लोक एकत्र आले. ही महाराष्ट्रातील सांस्कृतिक तथा धार्मिक बदलाची नांदीच ठरली. संत कवींच्या सहवासात आल्याने अनेक संत कवयित्रींही नामघोषात, भजनात तल्लीन झाल्या आणि संत कवींबरोबरच त्यांनाही साहित्याची वाचा फुटू लागली, त्याही काव्यरचना करू लागल्या

आणि अशा अनेक संत कवयित्री एकत्र आल्याने वारीच्या वाटेवर, भक्तीच्या मार्गावर संत कवयित्रींचा एक साहित्यिक प्रवाह निर्माण झाला, आणि दबलेल्या वेदनेचा हुंकार भक्तीमार्गाने बाहेर पडू लागला.

प्रस्तुत प्रकरणात वारकरी संप्रदायातील संत जनाबाई ते संत बहिणाबाई पर्यंतच्या कवयित्री आणि त्यांचे साहित्य याचाच प्रामुख्याने विचार करून मांडणी केली जाणार आहे.

**प्रकरण चौथे – वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या अभंगांचे स्वरूप :**

मध्ययुगीन महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संत कवयित्रींनी रचलेले अभंग अथवा भक्तीरसाने भरलेले काव्य, ओव्या यामधून तत्कालीन स्त्री–जीवनाविषयीचे उल्लेख आढळून येतात. तत्कालीन भारतीय समाजजीवन जे संत कवयित्रींनी अनुभवले, जे त्यांना जाणवले; ते त्यांच्या अंतःकरणाला खोलवर स्पर्श करणाऱ्या त्यांच्या साहित्यातून प्रगट झालेले दिसून येते. मध्ययुगीन महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई, संत सोयराबाई, संत सखूबाई, संत निर्मळा इत्यादी संत कवयित्रींनी त्यांच्या काव्यामधून समाजजीवनाच्या व स्त्री–जीवनाच्या वेगवेगळया अंगांवर प्रकाश टाकल्याचे दिसून येते.

**प्रकरण पाचवे – वारकरी संप्रदायातील संत कवयित्रींच्या स्त्री संवेदना : स्वरूप व प्रकार :**

मध्ययुगीन काळातील महाराष्ट्रात संत कवयित्रींची एक परंपराच होऊन गेलेली दिसून येते. त्यांनी जी काव्यरचना केली, त्यातून मानवी जीवनाची मूल्ये आणि स्त्री–जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांच्या काव्याचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या काव्यांमधून स्त्री–जीवनाचे अनुभव व स्त्रियांच्या दुःखमय जीवनाचे चित्रण केलेले आढळून येते. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजातील अनिष्ट परंपरा व पध्दतीवर टीका करुन त्याचा नायनाट करण्याच्या दृष्टीकोनातून समाजाला बोधप्रद मार्गदर्शन केले. त्यावरुन त्यांची भूमिका समाजहिताची व समाजाला शिक्षित करणाऱ्या समाज शिक्षकांसारखी होती; यावरुन संत कवयित्रींच्या स्त्री–संवेदना त्याचे स्वरुप आणि प्रकार प्रत्ययाला येतात.

**प्रकरण सहावे : वारकरी संप्रदायातील संतांपेक्षा स्त्री संतांचे संवेदनात्मक वेगळेपण :**

महाराष्ट्रात अनेक संत होवुन गेले. यातील अनेक संतांनी साहित्यिक रचना केली. यात प्रामुख्याने अभंग, ओवी, भारूड आणि गौळणी इत्यादींचा समावेश होतो. संतानी जी साहित्यिक रचना केली त्यात त्यांच्या जीवनशैलीचे, व्यवसायाचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. यात संत सेना, संत गोरोबा, संत सावता, संत नरहारी, संत चोखामेळा, संत तुकाराम अशी अनेक उदाहरणे आपणास देता येतात. परंतु व्यवसायाबरोबरच भाषेचे थोरपण आणि पुरुषी जीवनाचेही महत्त्व मांडले. उदा : 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा, ज्याचा तिन्हीं लोकी झेंडा' परंतु हीच भावना संत कवयित्रीही मांडतात. जर पुरुषाने त्रिलोकी झेंडा लावावा तर स्त्रियांनी सुध्दा 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावे उदास' अशीही रचना मांडलेली दिसून येते. म्हणून वारकरी संप्रदायातील संतांपेक्षा स्त्री संतांचे संवेदनात्मक वेगळेपण निश्चितच वेगळे असलेले आढळते. परंतु सर्वच संतांचा प्रवाह हा भगवद्भक्ती, नामघोष, सदाचार आणि आत्मोन्नती असाच होता, हे ही प्रकर्षाने जाणवते.

**प्रकरण सातवे : वारकरी संप्रदायातील स्त्री संताच्या अभंगातील संवेदनेचे मूल्यमापन :**

मध्ययुगीन महाराष्ट्रात संत जनाबाईपासून ते संत बहिणाबाई पर्यंत होऊन गेलेल्या संतक वयित्रींचे स्वरचित काव्य म्हणजे तत्कालीन समाजातील स्त्री–जीवनाचा आरसाच म्हटला पाहिजे. त्याच्या काव्यामधून तत्कालीन स्त्री–जीवनाच्या विविध पैलूंचे चित्रण साकार झालेले आहे. काही कवयित्री सामान्य कुटुंबातील व समाजात कनिष्ठ दर्जा असलेल्या हीन वर्गाच्या स्त्रिया होत्या. त्यांनी समाजात जे दुःखदायक व क्लेशकारक जीवन अनुभवले त्या अनुभूतींवर आधारलेल्या स्त्री–जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या भक्ती काव्यातून उमटलेले दिसून येते. त्या कवयित्रींचे साहित्य मध्ययुगीन स्त्री–जीवनाचा इतिहास अभ्यासण्याचे एक महत्त्वाचे व प्रभावी साधन म्हणावे लागेल.

**प्रकरण आठवे – समारोप :**

संत कवयित्रींनी मराठी साहित्याला आणि स्त्री–जीवनाच्या विकासाला मोठे योगदान दिले आहे. या संत स्त्रियांनी अभंग, ओव्या रचून भक्तिसंप्रदायाच्या साहित्यात मोठी मोलाची भर घातली. शिवाय या संत कवयित्रींनी शूध्द आचरणाचा आदर्श समाजासमोर निर्माण केला आणि समाजातील असंख्य स्त्रियांना आशावादी जीवन जगण्याची शिकवण दिली. त्यांनी धैर्य व बुध्दीमत्तेची चुणूक दाखवून स्त्रियांना आणि मानवजातीला मानवी मनातील अहंकाराचा त्याग करावयाचा धडा दिला. संत जनाबाई ही तर क्रांतीकारी संत कवयित्री म्हणून ओळखली जाते. शूद्र दासी म्हणून जीवन जगलेल्या संत जनाबाईने भारतीय स्त्रियांना स्वकृर्तत्त्वाने आत्मोन्नती करण्यासाठी आध्यात्मवादाचा मार्ग आवलंबिण्याविषयी आदर्श घालून दिला. संत कवयित्रींनी स्वकृर्तत्वाच्या बळावर आत्मविकासाचा मार्ग कसा साधता येतो व आध्यात्माच्या मार्गाने संसारात राहून मोक्षप्राप्ती मिळवून आत्मोन्नती कशी साधता येते याची शिकवण स्त्रीवर्गाला दिली. समाजात कनिष्ठ शूद्रांचा दर्जा असलेल्या स्त्रियांना आत्मोन्नतीसाठी व आत्मविकासासाठी धैर्य, विनम्रता, शुध्द चारित्र्य इत्यादी गुणांची गरज असते, हे त्यांनी स्वतःच्या उदाहरणांवरुन समाजाच्या निदर्शनास आणून दिले.

प्रकरणांचा दिलेला वरील आराखडा हा प्राथमिक पातळीवरचा असून त्यातील एखाद –दुसऱ्या प्रकरणात बदल होऊ शकतो.

संदर्भ ग्रंथ सूची :


१. गोसावी र.रा. (संपादक), **‘श्रीसकलसंतगाथा’,** सारथी प्रकाशन, २००५, सदाशिव पेठ पुणे, व्दितीय आवृत्ती (२०१६)

२. गावंडे डॉ. शैला, **‘१० संत कवयित्री’,** पुणे विद्यार्थी ग्रह प्रकाशन पुणे

३. शेवडे इंदुमती, **‘संत कवयित्री’** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९८९.

४. सरदार गं.बा., **‘संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती’,** लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई,नववी आवृत्ती २०१४.

५. इर्लेकर डॉ. सुहासिनी, **‘संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध’,** स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २००६.

६. दातार डॉ. आरती, **‘महाराष्ट्रातील संत कवयित्री’,** डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २००९

७. कौठेकर भगवान, **‘संत कवयित्री’** निर्मल प्रकाशन, नांदेड

८. शेणोलीकर ह.श्री., **‘प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप’,** मोघे प्रकाशन, पुणे व कोल्हापूर, सहावी आवृत्ती १९८७

९. जोशी प्र.न., **‘मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास’,** नितीन प्रकाशन, पुणे—३०, १९७२

१०. पठाण डॉ. यु.म., **‘संत साहित्य नवचिंतन’,** दिलीपराज प्रकाशन, पुणे

११. यादव प्रा.मा.के.,**‘मराठी संत कवयित्री’,** स्नेह वर्धन प्रकाशन, पुणे

१२. चोरघडे वामन के., (अनुवादक) **‘पूर्व आणि पश्चिमेच्या संत महिला’,** दि. सेक्रेटरी नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली, १९६७

१३. देशपांडे अ.ना., जोशी म.रा., **‘प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास’** भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९६

१४. नेमाडे भालचंद्र, **‘टीकास्वंयवर’,** साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, १९९०



**संशोधक**

**बाळासाहेब निवृत्ती कराड**
**एम.ए मराठी, समाजशास्त्र. बी.एड. सेट**

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ. बाळासाहेब रंगनाथराव दहिफळे**
**एम.ए.मराठी, बी.एड्.एम.फिल,पीएच.डी.सेट**
**संशोधक मार्गदर्शक,मराठी विभाग**
**महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर**